# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवायै समर्पिता

## दिनांक ३१.०३.२००६ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक **३१ मार्च २००६** रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तणवानी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी ५.०० वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली . सभेला मा.आयुक्त यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.काशिनाथ कोकाटे
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१५. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१६. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१७. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
१८. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
१९. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२०. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२१. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२२. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२३. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२४. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२५. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
२६. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
२७. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
२८. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
२९. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३०. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३१. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३२. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस

३३. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३४. स.स.श्री.खान निसार मो.खान
३५. शेख इब्राहीम पटेल
३६. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३७. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
३८. स.स.सौ.राऊत छाया विलास
३९. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४०. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४१. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४२. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४३. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
४४. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
४५. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४६. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
४७. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४८. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
४९. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५०. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५१. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५२. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५३. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५४. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५५. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५६. स.स.श्री.खुडे विजय किसन
५७. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
५८. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
५९. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६०. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६१. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६२. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६३. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६४. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६५. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६६. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६७. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६८. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
६९. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७०. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७१. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७२. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७३. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७४. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा

७५. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७६. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७७. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७८. स.स.श्री.बारवाल गजानन
७९. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८०. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
८१. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०२. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल

**संवाद :**

श्री. वसंत नरवडे : महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडील १०५ कोटीची थकबाकी असतांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तसेच जलसंपदा मंत्री मा.ना.श्री.अजीत पवार यांनी माफ केली , औरंगाबाद महानगरपालिकेचे मा.महापौर व सर्व पदाधिकारी यांनी तसेच मा.आयुक्त व या सभागृहाचे स.सदस्य यांनी वेळोवेळी पाठपूरावा करून जलसंपदा मंत्री यांचेकडे मागणी करून थकबाकी माफ करून घेतली. मा.जलसंपदा मंत्री व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी महापालिकेचा आर्थिक बोजा कमी केला त्याबद्दल मी सर्व सदस्यांच्या वतीने शहरातील नागरीकांच्या वतीने व माझ्या वतीने महाराष्ट्र शासनाचा अभिनंदनाचा ठराव पूढील बैठकीत मांडावा अशी विनंती करतो.

मा.महापौर : आजची विशेष सभा आहे प्रस्ताव आपल्या सभागृहात आलेला नाही. पूढील बैठकीत प्रस्ताव घेता येईल.

श्री. प्रशांत देसरडा :प्रस्ताव ठेवतांना ज्यांनी मत्रीमंडळात प्रश्न उपस्थित त्यांचे सुध्दा नाव सविस्तर प्रस्तावात यावे अशी विनंती.

श्री.संजय जोशी :मा.ना. श्री. श्रीकांत जोशी तसेच श्री. अवचट साहेब यांनी प्रश्न उपस्थित केलेला होता. त्यांचेही नाव प्रस्तावात येवू दयावे.

श्री. पुरूषोत्तम ठाकूर : महापालिकने वकीलाचे पॅनल नियुक्त केलेले आहे ॲड सोमन हे बिल्डरांना मिळालेले आहे. महापालिकेच्या हिताचे काम करीत नाही.

मा. महापौर : आजची सभा विषेश सभा आहे. सर्वसाधारण सभेत हा विषय मांडावा.

**विषय क्र. २१७ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ अन्वये सन २००५-२००६ चे सुधारीत व सन २००६-२००७ चे मुळ अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

उपआयुक्त (प्र.) : मागिल सन २००५-०६चा सूधारीत व सन २००६-०७ चा मुळ अर्थसंकल्प मा.सभापती श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ यांनी मा.महापौर यांचेकडे सादर करावा व त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करावे. अशी विनंती करण्यांत येते.

(याच वेळी मा. सभापती हे अर्थसंकल्प मा. महापौर यांचेकडे सादर करतात व मा. महापौर यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करतात तसेच सर्व पदाधिकारी मा. आयुक्त यांचे सुध्दा पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात येते.)

मा. महापौर : सभापती ,स्थायी समिती यांनी मागिल वर्षाचे सुधारीत व चालू वर्षाचे मूळ अर्थसंकल्प सादर केलेला आहे. सभागृहाच्या माहितीसाठी सभापती हे त्यांचे निवेदन करीत आहे.

मा.सभापती : ऐतिहासिक महत्व आणि मराठवाड्याच्या राजधानीचा दर्जा असलेल्या औरंगाबाद शहराच्या महानगरपालिकेचा अर्थसंकल्प सलग दुसऱ्यांदा मांडणारा मी एकमेव सभापती असल्याबद्दल आज हा चोवीसावा अर्थसंकल्प सादर करतांना माणा आनंद द्विगुणित झाला आहे. या निमित्ताने माझ्या गेल्या वर्षीच्या... तेवीसाव्या अर्थसंकल्पाचा ताळेबंद मांडण्याची संधी मला प्राप्त झाली आहे.

मी सादर केलेल्या दोन्ही अर्थसंकल्पात महत्वाची बाब म्हणजे औरंगाबादकरांवर कोणत्याही प्रकारचा नवीन करवाढीचा बोजा पडणार नाही, याची काळजी घेण्यात आली आहे. अतिशय अभिमानाने नमुद करावी अशी ही बाब आहे. करवाढ हा उत्पन्न वाढविण्याचा एकमेव मार्ग नाही, या माझ्या भुमिकेवर मी आजही ठाम आहे. ह्याच भुमिकेतून प्रशासनाने पाणीपट्टीत सूचविलेली १,१००/- रू.ची वाढ फेटाळण्यात आली. करवाढीचा फटका फक्त प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या नागरीकांनाच बसतो आणि वर्षानुवर्ष कर चुकविणाऱ्या भस्मासुरांची थकबाकी वाढतच चालली असल्याचे चित्र आहे. हे चित्र बदलून टाकण्याचा माझा प्रयत्न राहीला. त्यादृष्टीने मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीवर संपूर्ण लक्ष केंद्रित करण्यात आले. स्थायी समितीच्या जवळपास सर्वच बैठकांतून वसूली प्रकरणी प्रशासनाला धारेवर धरण्यात आले. प्रशासनाला कधी फटकारत कधी चुचकारत सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आणि त्याचे फलित म्हणजे गेल्या १० महिन्यात मनपाच्या इतिहासातील विक्रमी कर वसूली झाली.

सन २००२-२००३ मध्ये ९ कोटी ५१ लाख ६० हजार रूपये, सन २००३-२००४ मध्ये ९ कोटी ६७ लाख ४१ हजार रूपये, २००४-२००५ मध्ये ९ कोटी २७ लाख ९० हजार रूपये असे वसूलीचे आकडे २००५-२००६ या आर्थिक वर्षाच्या केवळ १० महिन्यात मालमत्ता करापोटी (२१ मार्च २००६ पर्यंत) १३ कोटी ७१ लाख ८७ हजार १३ रूपये व पाणीपट्टी पोटी १२ कोटी ९७ लाख ५८ रूपये असे एकूण २६ कोटी ६९ लाख ८७ हजार ७१ रूपये पर्यंत पोहचले आहेत. ३१ मार्च पर्यंत ३० कोटीचा आकडा पार होईल असा विश्वास आहे. रूळावरून घसरलेली मनपाची आर्थिक गाडी रूळावर आणण्याचे माझे प्रयत्न यशस्वी झाले आहेत, असे मी अभिमानपूर्वक नमूद करतो आहे. अर्थात ही वसूली समाधानकारक आहे असे मात्र मानता येणार नाही. उद्दिष्टाच्या ३७.५ टक्केच ही वसुली आहे. हे प्रमाण किमान ७०-८० टक्के असले पाहीजे पण गेल्या २४ वर्षाच्या पार्श्वभुमीवर स्थायी समितीचे हे यश मान्य करावेच लागेल.

औरंगाबादकरांना चांगल्या सुविधा-सेवा उपलब्ध करून देण्यासाठी, शहराचा विकास करण्यासाठी मनपाचा आर्थिक कणा भक्कम असायलाच हवा असा आग्रह आहे. त्यासाठी कर वसुली झालीच पाहीजे शिवाय जकातीचे उत्पन्नही वाढलेच पाहिजे हे धोर स्विकारण्यात आले आणि खाजगीकरण हा एकच समर्थ पर्याय समोर आला. २००२-२००३ या आर्थिक वर्षात ५७ कोटी ४३९ रूपये, २००३-२००४ मध्ये ६२ कोटी ८० लाख ८८ हजार रूपये, २००४-०५ मध्ये ७१ कोटी ५ लाख ९ हजार रूपये असे उत्पन्न मनपाला मिळाले. २००५-०६ मध्ये सर्व प्रकारचे प्रयत्न करूनही ८० कोटीच्या बाहेर जकातीचे उत्पन्न जात नाही असे दिसून आल्यानंतर स्थायी समितीने खाजगीकरणाचा प्रस्ताव एकमताने मंजुर केला. २००६-०७ या आर्थिक वर्षात आता १०१ कोटी रू.जकात खाजगीकरणाच्या माध्यमातून मनपाच्या तिजोरीत जमा होणार आहेत. शिवाय जकात विभागातील मनपाचे १०० कर्मचारी वसुलीच्या अन्य कामासाठी उपलब्ध

होणार आहेत. त्यामुळे या आर्थिक वर्षात मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली वाढणार हे ओघानेच स्पष्ट होते. जकात खाजगीकरणामूळे मनपाच्या तिजोरीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे २५ कोटी रूपये जास्तीचे पडणार आहेत. त्यामूळे शहर विकासाचे दरवाजे खूले होतील, नागरीकांना सेवा-सुविधा चांगल्याप्रकारे मिळतील अशी अपेक्षा आहे. जकात खाजगीकरण प्रकरणात अनेक उलट-सुलट चर्चा कानावर आल्या आहेत. अशा चर्चाबद्दल काय बोलणार? ऑस्कर वाईल्ड या विचारवंताने एक ठिकाणी म्हटले आहे, 'आपल्या निर्णयाचे समर्थन कधीही देऊ नका, तुमच्या मित्रांना त्याची गरज नाही आणि तुमचे शत्रु त्यावर विश्वास ठेवणार नाहीत.'

सन २००५-०६ च्या तेवीसाव्या अर्थसंकल्पीय भाषणात मी गुंठेवारी, बी.ओ.टी. डिफर पेमेंटवर रस्ते, शहर सौंदर्यीकरण, शहराचे पर्यटन क्षेत्रातील महत्व आदी विषयांवर चर्चा केली होती. सांगायला समाधान वाटते की, या सर्व विषयांना गती देण्याचे काम स्थायी समितीने केले आहे. गुंठेवारीचा प्रश्न मार्गी लागला आहे. मनपात पर्यटन विभाग नव्याने निर्माण करण्यात येवून त्यासाठी अधिकारीही नेमण्यात आला आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात पर्यटन स्थळाची माहिती देणारे बोर्डही लावण्यात आले आहेत, बी.ओ.टी. तत्वावर योजना कार्यान्वित होण्याच्या टप्प्यावर आहेत. डिफर पेमेंटवर रस्ते तयार करण्याच्या निविदा निघालेल्या आहेत.

स्थायी समितीच्या दहा महिन्याच्या कार्यकाळात शहरवासीयांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर निर्णय घेण्यात आले. त्यापैकी सर्वात महत्वाचा शहर बस सेवेचा प्रश्न यशस्वीपणे सोडविण्यात मिळालेले यश उल्लेखनीय मानावे लागेल. हा प्रश्न सोडवितांनाही मनपाच्या तिजोरीत भर पडेल याची दक्षता घेण्यात आली आहे. सिडको-हडको परिसराचे हस्तांतरण हा दिर्घकालीन प्रलंबित प्रश्नही चांगल्या पध्दतीने सोडविण्यात आला आहे. या प्रकरणात नगर विकास राज्यमंत्री मा.ना.श्री.राजेशभैय्या टोपे यांनी घेतलेल्या सकारात्मक भुमिकेचा येथे उल्लेख होणे अत्यावश्यक आहे.एकंदर मागे वळून पाहिले असता,गेल्यादहा महिन्यातील स्थायी समितीचे अनेक निर्णय दिर्घकाळ परिणाम करणारे आहेत,त्याबद्दल समाधान वाटते

सन २००६-०७ च्या म्हणजे चोवीसाव्या अर्थसंकल्पातही अनेक महत्वाच्या विकास योजना डोळ्यासमोर ठेवण्यात आल्या आहेत. सिडको-हडको परिसर आता मनपाच्या अखत्यारित आल्यामूळे या भागाच्या विकासाच्या अनेक योजना आखण्यात आल्या आहेत. बॉटनिकल गार्डन सारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी एक कोटी रू.ची तरतूद ठेवून सिडको विकासाला चालना देण्याचा प्रयत्न आहे. गरवारे क्रिडा संकुलात आंतरराष्ट्रीय स्तराचा जलतरण तलाव बांधण्याचा प्रकल्पही हाती घेण्यात आला असून त्यासाठी अर्थसंकल्पात १ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. 'टाऊन हॉल' चे पुन:रूज्जीवन करण्याची ऐतिहासिक स्वरूपाची योजना हाती घेण्यात आली आहे. 'टाऊन हॉल' चे जुने वैभव कायम ठेवून त्याच्या सौद्र्यीकरणात भर घालण्यात येणार आहे. पावसाळ्याचे चार महिने वगळता तेथे दररोज विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम व्हावे,अशी ही योजना आहे. त्यामुळे भविष्यात 'टाऊन हॉल' हे देशी विदेशी पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र बनेल असा विश्वास वाटतो. या अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे विकास आणि उपलब्ध निधी याची सांगड घालण्यात आली आहे. अत्यंत समतोल असा हा अर्थसंकल्प असल्याचे माझे प्रामाणिक मत आहे.

माझ्या कार्यकाळात मला स्थायी समितीच्या सर्वच सदस्यांचे एकमुखी पाठबळ मिळाले आहे. किंबहुना मी जे काही चांगले काम करू शकलो त्याचे संपूर्ण श्रेय माझ्या सहकारी सदस्यांनाच जाते. मा.महापौर किशनचंद तनवाणी, मा.उपमहापौर भगवान घडमोडे, मा.सभागृह नेता संजयजी शिरसाट, मा.विरोधी पक्षनेता तरविंदरसिंग धिल्लन यांनी मला पाठबळ दिले नसत तर मी चांगल्याप्रकारे काम करू शकलो नसतो हेही खरेच आहे. त्यामूळे या सर्व सहकारी पदाधिकाऱ्यांचे मी ऋण व्यक्त करतो.

प्रशासनीक पातळीवर अधिकाऱ्यांशी अनेकदा वाद झाले असले तरी ते वाद वैयक्तिक स्वरूपाचे कधीही नव्हते. प्रशासनाने चांगल्या योजना राबवाव्या व शहरातील नागरीकांना योग्यप्रकारे सुविधा देण्यासाठी काम चांगले व्हावे याकरिता तो अट्टाहास होता. तथापि मा.आयुक्त असीम गुप्ता व त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांनी स्थायी समितीला अतिशय चांगल्याप्रकारे सहाकार्य केले हेही मी नमुद करतो.

धन्यवाद !

याच वेळी मा.सभापती यांनी पावर पॉईट प्रेझेन्टेशनने सभागृहात अर्थसंकल्पातील लेखाजोखा निदर्शनास आणून देवून माहिती दिली.

श्री. प्रकाश अत्तरदे : अर्थसंकल्पात सिडको भागातील विकास कामे समावेश करावी म्हणून पत्र देवूनही कामाचा बऱ्याच कामाचा समावेश यात झालेला नाही. सिडको भागात ११ वी स्कीम मधील पाण्याच्या पाईप लाईन बदलणे आवशक आहे.ते कामे या बजेटमधे समावेश झालेले नाही.

श्री. संजय शिरसाट : मा.सभापती यांनी चांगला अर्थसंकल्प सादर केलेला आहे. आज सकाळी स्थायी समितीची सभा होती. व त्यानंतर लगेच स्थायी समितीचे आठ सदस्य निवडीची विषेश सर्वसाधारण सभा संपन्न झाली. आता उशीर झालेला आहे. अर्थसंकल्पावर अभ्यास करण्यासाठी वेळ द्यावा.आजची सभा तहकूब करून येत्या पाच तारखेला सभा आयोजित करावी. अशी सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

श्री. संजय जोशी : पहिल्यांदाच इतक्या चांगल्या पध्दतीने अर्थसंकल्प मांडला गेला त्या बध्दल मा.सभापती स्थायी समिती यांचे अभिनंदन करतो तसेच प्रशासनाने जी वसुली मोहिम सूरू केलेली आहे. त्याबध्दल प्रशासनाचे सुध्दा अभिनंदन करण्यात येते. महापालिकेच्या इतिहासात पहिली घटना असावी की वसूली करतांना प्रशासनास काही अडचणी आल्या अशा वेळी मा.महापौर यांनी स्वत: जावून गुन्हा नोंदवावयास लावला ही सुध्दा आनंददायक बाब आहे. वसूलीच्या बाबतीत प्रशासनाने जे निर्णय घेतलेले आहे ते योग्य आहे .

श्री. वसंत नरवडे :अर्थसंकल्पावर स. सदस्यांना सविस्तर अशी चर्चा करायची आहे. त्यासाठी आजची सभा तहकूब करावी.

मा. महापौर :सभागृहाचे मत लक्षात घेता आजची सभा तहकूब करण्यात येत असून ०५ एप्रिल २००६ रोजी सकाळी ११.०० वाजता सभा आयोजित केली जाईल.

या नंतर आजची सभा तहकूब केल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका, औरंगाबाद.